# पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

3 रा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-411001

पी.बी.एक्स. क्र. 020-26126785 / 26126628

Email ID : dirmktms@gmail.com    Website :www.mahapanan.maharashtra.gov.in


जा.क्र.पणन-५(अ)/थेट पणन/परिपत्रक/सूचना/ 5410 /२०२२    दि: ३०/११/२०२२

## परिपत्रक

**विषय : थेट पणन परवान्यासाठी संकलन केंद्रावर निर्माण करावयाच्या सुविधा**

**वाचावे** : या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.पणन-५(अ)/थेट पणन/परिपत्रक/सूचना/१६१९ /२०२१ दि: ३१/०३/२०२१

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ५ ड व नियम, १९६७ मधील ४ ब नुसार थेट शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदी करण्यासाठी या कार्यालयामार्फत थेट पणन परवाना देण्यात येतो.सदर अधिनियम, नियमातील तरतूदी, परवान्यातील अटी शर्ती, कामकाजाची मार्गदर्शक तत्वे व या बाबतच्या परिपत्रकीय सूचनांस अनुसरुन थेट पणन परवाना धारकाने कामकाज करणे बाबत तसेच थेट पणन परवान्यासाठी आवश्यक कागदपत्रांच्या अनुषंगाने या कार्यालयाने वाचावे मधील परिपत्राकन्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमीत केलेल्या आहेत.

थेट पणन परवाना धारकाने संकलन केंद्रावर शेतक-यांकडून शेतमाल खरेदी करणे आवश्यक असुन त्यासाठी संकलन केंद्रावर शेतक-यांसाठी आवश्यक त्या सुविधांची उभारणी करणे आवश्यक आहे.

**संकलन केंद्रावर निर्माण करावयाच्या सुविधा-**

१) खरेदी केंद्राची जागा वैयक्तीक अर्जदाराच्या स्वमालकीची असल्यास मालकी हक्काची कागदपत्रे अथवा भाडेकराराची कागदपत्रे सादर करावीत.

२) अर्जदार शेतकरी उत्पादक कंपनी /सहकारी संस्था/कंपनी /भागीदारी संस्था असल्यास त्या संस्थेच्या नांवाने खरेदी केंद्राच्या जागेबाबत मालकी हक्क कागदपत्रे अथवा भाडेकराराची कागदपत्रे सादर करावीत.

३) खरेदी केंद्राची जागा भाडेतत्वावर असल्यास किमान १० वर्ष मुदतीचा नोंदणीकृत भाडेकरार सादर करावा.

४) खरेदी केंद्रावर किमान ५टन क्षमतेचा वजनकाटा बसविण्यात यावा. बसविण्यात आलेल्या वजनकाटयाचा तपशिल (क्षमता) इ. नमूद करुन त्यांचे पूरावे (फोटो) प्रस्तावासोबत सादर करावेत.

५)खरेदी केंद्रावर कृषी मालाच्या प्रकारानुसार क्लिनिंग ग्रेडींग ची सुविधा उभारण्यात यावी व त्याचे पूरावे (फोटो) सादर करावेत.

६)खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा निर्माण करावीव त्याबाबतची आवश्यक ते पूरावे (फोटो) प्रस्तावासोबत सादर करावेत

७)कृषीमाल साठविण्यासाठी खरेदी केंद्रावर गोदामाची व्यवस्था करावी व नाशवंत स्वरुपाचा कृषी माल खरेदी करावयाचा असल्यास आवश्यकते नुसार कोल्ड स्टोअरेजची उभारणी करावी.व त्या बाबतचे पूरावे (फोटो) प्रस्तावासोबत सादर करावेत.

८)खरेदी केंद्राच्या ठिकाणी महिला व पुरुषांकरीता स्वतंत्र स्वच्छता गृहांची व्यवस्था करावी.

९)खरेदी केंद्रावर संगणक सुविधा निर्माण केल्या बाबतचे पुरावे सादर करावेत.

१०) अर्जदार व्यक्ती, कंपनी आणि कंपनील संचालक , संस्था आणि संस्थेचे संचालक, फर्म आणि फर्मचे भागीदार हे महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये संचालक, अडतदार किंवा व्यापारी म्हणून कामकाज करीत नसलेबाबत रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईझड प्रतीज्ञापत्र दोन साक्षादारांच्या स्वाक्षरीसह प्रस्तावासोबत सादर करावे.

थेट पणन परवाना प्राप्त झाल्यानंतर परवाना धारकाने सुरु केलेल्या खरेदी केंद्राची नावे,सविस्तर पत्ते इ तपशिल महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांचे संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरणा करावा.तसेच पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना प्रत्यक्ष कागदपत्रे सादर करावीत.ज्या ठिकाणी संकलन केंद्रे उभारणी केली जातील त्या ठिकाणी वरील सर्व सुविधांची उभारणी करणे बंधनकारक राहील.

वरील सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सर्व थेट पणन परवाना धारकांची राहील.

(सुनिल पवार)
पणन संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी**

१) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

आपणांस कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील थेट पणन परवाना धारकांनी खरेदी केंद्रावर वरील प्रमाणे सुविधांची उभारणी केलेबाबत खातरजमा करावी व वेळोवेळी या बाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे

३) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

४) थेट पणन परवानाधारक (सर्व)

पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ रा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१
पीबीएक्स ०२० - २६१२६६२८ /२६१२६७८५/ २६११४०६४
Email :- dirmktms@gmail.com Website:www.mahapanan.maharashrta.gov.in


जा.क्र.पणन-५(अ)/थेट पणन/परिपत्रक/सूचना/ 86 /२०२३ दि: ०६/०१/२०२३

प रि प त्र क

**विषय : थेट पणन परवान्यासाठी संकलन केंद्रावर निर्माण करावयाच्या सुविधा बाबत या कार्यालयाच्या दि. ३०/११/२०२२ रोजीच्या परिपत्रकामध्ये अंशत: बदल करणे बाबत**

**वाचावे :** या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.पणन-५(अ)/थेट पणन/परिपत्रक/सूचना/५४१०/२०२२ दि. ३०/११/२०२२

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ५ ड व नियम, १९६७ मधील नियम ४ ब नुसार थेट शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदी करण्यासाठी या कार्यालयामार्फत थेट पणन परवाना देण्यात येतो. थेट पणन परवान्यासाठी संकलन केंद्रावर निर्माण करावयाच्या सुविधांच्या अनुषंगाने या कार्यालयाने वाचावे मधील परिपत्रकान्वये सूचना निर्गमीत केलेल्या आहेत. तथापि सदर परिपत्रकातील काही अटीमध्ये बदल करण्याबाबत बहुतांश थेट पणन परवान्यासाठी आलेल्या अर्जदारांकडून विनंती या कार्यालयास करण्यात आलेली आहे, त्या अनुषंगाने दि.३०/११/२०२२ च्या परिपत्रकामध्ये अंशत: बदल करणे आवश्यक झालेले असल्याने संदर्भीय परिपत्रकातील अट क्र.३,४,७ व १० याअटींमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

**अट क्र.३)** खरेदी केंद्राची जागा भाडेतत्वावर असल्यास किमान १० वर्ष मुदतीचा नोंदणीकृत / नोटराईज्ड भाडेकरार सादर करावा.

**अट क्र.४)** खरेदी केंद्रावर किमान १०० कि.ग्रॅ. क्षमतेचा वजनकाटा बसविण्यात यावा. बसविण्यात आलेल्या वजनकाटयाचा तपशिल (क्षमता) इ. नमूद करुन त्यांचे पुरावे (फोटो) प्रस्तावासोबत सादर करावेत.

**अट क्र.७)** कृषीमाल साठविण्यासाठी खरेदी केंद्रावर आवश्यकतेनुसार साठवणुकीची व्यवस्था करावी.

**अट क्र.१०)** अर्जदार व्यक्ती, कंपनी आणि कंपनीतील संचालक , संस्था आणि संस्थेचे संचालक, फर्म आणि फर्मचे भागीदार हे महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये संचालक म्हणून कामकाज करीत नसलेबाबत रु.२००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड प्रतीज्ञापत्र दोन साक्षीदारांच्या स्वाक्षरीसह प्रस्तावासोबत सादर करावे.

या कार्यालयाच्या संदर्भीय दि. ३०/११/२०२२ रोजीच्या परिपत्रकातील उर्वरीत अटी व शर्ती कायम राहतील. तरी थेट पणन परवाना धारकांनी सदर परिपत्रकीय तरतूदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

(विनायक कोकरे)
पणन संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी**

१. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे
२. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४. थेट पणन परवानाधारक (सर्व)